रयत शिक्षण संस्थेचे

सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

उद्योजकता विकास केंद्र

**ट्रेड फेयर -२०२३**

# अहवाल

दिनांक ०७ फेब्रुवारी २०२३ रोजी सदगुरु गाडगे महाराज कॉलेज मध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योजकता विकास केंद्रा मार्फत ट्रेड फेयर- २०२३ चे आयोजन करण्यात आले होते. विध्यार्थ्यांच्यामध्ये उद्योजकतेबद्दल जागरूकता निर्माण व्हावी आणि खरेदी विक्री चे ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने या ट्रेड फेयर चे आयोजन करण्यात आले होते. या ट्रेड फेयर च उदघाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, अलंकार हॉटेल चे मालक, मा. दीपक अरबूने यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ मोहन राजमाने हे होते. प्रा एम बी कांबळे मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा. डॉ यु. बी मोरे यांनी आभार मानले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ मोहन राजमाने यांनी ट्रेड फेयर घेण्यासाठीचा उद्धेश व त्याचे महत्त्व सांगितले.

या ट्रेड फेयर मध्ये २०० स्टॉल धारकांनी स्टॉल लावून आपला सहभाग नोंदवला. यामध्ये शेती उत्पादने, सौंदर्य प्रसाधने, खाद्य पदार्थ, शोभेच्या वस्तू , फ्रुट ज्युस व रसवंती,स्टेशनरी , पुस्तके, शोभेच्या वस्तू ,इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोटारसायकल इत्यादी स्टॉल चा समावेश होता. या ट्रेड फेयर साठी कराड व परिसरातील १०,००० हुन अधिक नागरिकांनी भेट देऊन खरेदीचा आनंद लुटला. या ट्रेड फेयर मध्ये रु. १२,०००००/ ची उलाढाल झाली. या ट्रेड फेयर मधून उत्कृष्ट स्टॉल, उत्कृष्ट विक्रेता आणि उत्कृष्ट कुक असे तीन क्रमांक विध्यार्थ्यांच्यामधून काढण्यात आले व त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक, डॉ एस.जी.पार्टे व त्यांच्या इतर सहकाऱ्यानी काम पहिले. हा ट्रेड फेयर यशस्वीरित्या पूर्ण होण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.एस.ए.पाटील, प्रा.नेताजी सूर्यवंशी तसेच रजिस्ट्रार आर.वाय.गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

समन्वयक
उद्योजकता विकास केंद्र

प्राचार्य
स.गा.म कॉलेज, कराड











